www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-३७ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २ जून २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

## जिल्ह्याचा वार्षिक पतआराखडा ३३ हजार ५०० कोटी रुपयांचा पिककर्ज पुरवठ्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्ह्याचा सन २०२५-२६ करीता ३३ हजार ५०० कोटी रुपयांचा वार्षिक पतआराखडा तयार करण्यात आला आहे. आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते या पतआराखड्याचे विमोचन करण्यात आले. शेतकऱ्यांना वेळेत पिक कर्ज पुरवठा होण्यासाठी बँकांनी कालबद्ध पद्धतीने कार्यक्रम राबवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व बँकांना दिले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हा बँकर्स समितीच्या तिमाही बैठकीत हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी अशोक शिरसे, भारतीय रिझर्व बँकेचे अमितकुमार मिश्रा, बँक ऑफ महाराष्ट्र्चे विभागीय व्यवस्थापक विवेक नाचणे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक सुरेश पटवेकर, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे तसेच सर्व बँकांचे, महामंडळे व शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्याचा सन २०२५-२६ चा वार्षिक पतआराखडा यावेळी सादर करण्यात आला. हा पतआराखडा एकूण ३३ हजार ५०० कोटी रुपयांचा असून त्यात प्राधान्यक्षेत्रासाठी १६ हजार ७०० कोटी रुपयांचा आराखडा आहे. त्यात पिक कर्ज २४०० कोटी रुपये, मुदत कर्जे ३२०० कोटी रुपये असे एकूण कृषीक्षेत्रासाठी ५६०० कोटी रुपये, इतर प्राधान्य क्षेत्रासाठी १४०० कोटी रुपये , सुक्ष्म व लघु उद्योग क्षेत्रासाठी ९७०० कोटी रुपये असे एकूण प्राध्यान्य क्षेत्रासाठी १६ हजार ७०० कोटी रुपये, तर इतर (प्राधान्य नसलेल्या क्षेत्रासाठी) १६ हजार ८०० कोटी रुपये असे एकूण ३३ हजार ५०० कोटी रुपयांचा आराखडा सादर करण्यात आला.

तसेच सन २०२४-२५ मध्ये गाठलेल्या आर्थिक उद्दिष्टांचाही आढावा यावेळी घेण्यात आला. माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात सार्वजनिक व सहकारी बँका असे मिळून एकूण ५१२ शाखांचे जाळे आहे. प्राधान्य क्षेत्रासाठी ठरविण्यात आलेल्या १३ हजार ९०० कोटी रुपयांच्या वार्षिक पतपुरवठ्याच्या तुलनेत १५ हजार ८०६ कोटी रुपयांचे वितरण झाले. हे एकूण ११४ टक्के आहे. त्यात कृषी क्षेत्रासाठी ४हजार ७५० कोटी रुपयांच्या तुलनेत ५ हजार २८९ कोटी रुपयांचे वितरण झाले. गत वर्षी पिक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट २४०० कोटी रुपये इतके होते प्रत्यक्षात ते २ हजार १३० कोटी रुपये म्हणजेच ९० टक्के झाले, अशी माहिती यावेळी देण्यात आली. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, जिल्ह्यात विविध क्षेत्रात बँकानी अर्थसहाय्य करणे आवश्यक आहे. महिलांच्या स्वयंरोजगारासाठी स्वयंसहायता गटांना केला जाणारा पतपुरवठा चांगला असून त्याद्वारे महिलांना रोजगार व्यवसायाची संधी उपलब्ध होत आहे. ज्या क्षेत्रात रोजगाराच्या संधींना वाव आहे तेथे अर्थ पुरवठा वाढवला पाहिजे. पिक कर्ज वाटप हे योग्य त्या वेळेत होणे आवश्यक आहे. त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवून शेतकऱ्यांना वेळेत अर्थ पुरवठा व्हावा. जेणे करुन त्यांना पैसा वेळेत कामात यावा.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत आणि प्रकल्प व्यवस्थापक अशोक शिरसे यांनीही आपले मनोगत यावेळी मांडले.

## सावधान!
## देशात ३२०७ करोना बाधित, तर २० जणांचा मृत्यू, केरळमध्ये सर्वाधिक रुग्णांची नोंद

**नवी दिल्ली**

देशभरात करोना विषाणूच्या जेएन.१ या नव्या प्रकाराच्या बाधित रुग्णांची देशभरातील संख्या ३,२०७वर पोहोचली आहे. सध्याच्या उद्रेकात देशभरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २० झाली आहे. यातील सर्वाधिक, म्हणजे ६ मृत्यू महाराष्ट्रात झाले आहेत. मात्र नव्या विषाणूमुळे प्राणहानी होण्याची शक्यता कमी असल्याने त्याची भीती बाळगण्याची गरज नाही, असे वैद्यकीय तज्ज्ञांनी पुन्हा अधोरेखित केले आहे. यंदा आत्तापर्यंत करोनावर मात करून १,७१० रुग्ण बरे झाले आहेत.

केरळमध्ये सर्वाधिक १,१४७ करोना बाधित रुग्ण असून महाराष्ट्र याबाबत दुसऱ्या क्रमांकावर आहे. शुक्रवारी आढळलेल्या ८४ नवीन रुग्णांसह राज्यात सध्या ६८१ रुग्ण आहेत. देशातील बाधित रुग्णांपैकी ६० टक्के रुग्ण या दोन्ही राज्यांमध्ये आहेत. राजधानी दिल्लीत एकूण बाधित रुग्णांची संख्या २९४ असून शुक्रवारी करोनामुळे दिल्लीत एका महिलेचा मृत्यू झाला.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्यांना प्रसृत केलेल्या दिशानिर्देशांत राज्यांना प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे, लोकांना मोठ्या सभा-मेळाव्यांपासून रोखण्याचे आणि मास्क वापरण्यास प्रोत्साहन देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आरोग्य मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पाठविलेल्या पत्रांत, आपापल्या रुग्णालयांच्या तयारीचा वारंवार आढावा घेण्याची सूचना केली आहे. मुलांमध्ये करोना विषाणूची लक्षणे आढळली तर त्यांना शाळेत पाठवू नये, असे निर्देश कर्नाटक सरकारने दिले आहेत. दरम्यान, देशात या विषाणूचे चार नवीन प्रकार आढळले आहेत, असे आयसीएमआरचे संचालक डॉ. राजीव बहल यांनी सांगितले.

### सातारा येथे वृद्धेचा मृत्यू

सातारा जिल्हा रुग्णालयात करोनावर उपचार घेत असणाऱ्या ७० वर्षीय महिलेच्या मृत्यू झाल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर युवराज करपे यांनी शनिवारी सांगितले. साताऱ्यात अडीच वर्षांनंतर करोनाचे दोन रुग्ण आढळून आले. त्यापैकी एक कराड येथील सह्याद्री रुग्णालयात उपचार घेत आहे, तर एक महिला सातारा जिल्हा रुग्णालयात उपचार घेत होती. या महिलेचा मृत्यू झाला.

## नूतन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी कार्यभार स्वीकारला



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर : नूतन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला. सेवानिवृत्त होत असलेले विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्याकडून त्यांनी पदभार स्विकारला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर आयुक्त अनंत गव्हाणे, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी श्री पापळकर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी नगरविकास विभागाचे सहआयुक्त देविदास टेकाळे यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख उपस्थित होते.

विभागीय आयुक्तश्री पापळकर यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधत विभागातील माहिती जाणून घेतली. नवनियुक्त विभागीय आयुक्तश्री. पापळकर हे २०१० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला जिल्हाधिकारी, हिंगोली जिल्हाधिकारी, धुळे जिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले आहे.

## तुळजापूरच्या श्रीक्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखड्यासाठी नियोजन विभागाकडून १ हजार ८६५ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता

### अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाचा शासननिर्णय जारी

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने तुळजापूर येथील श्रीक्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकासासाठी १ हजार ८६५ कोटी रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली असून त्या संदर्भातील शासननिर्णय आज जारी करण्यात आला आहे. या आराखड्याच्या संनियंत्रण व अंमलबजावणीची जबाबदारी धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात सातत्याने यासंबंधीच्या बैठका घेऊन पाठपुरावा केला होता.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून श्रीतुळजाभवानी देवीला महत्वं आहे. देवीच्या साडेतीन शक्तीपिठांपैकी आदिशक्तीचे मूळ स्थान तुळजापूर येथे आहे. देवीच्या दर्शनासाठी वर्षभर भाविक मोठ्या संख्येने येत असतात. नवरात्रीच्या काळात मंदिरात मोठा उत्सव, भक्तांची गर्दी असते. ऐतिहासिक, आध्यात्मिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या तुळजाभवानी देवस्थानच्या विकासाच्या दृष्टीने आजचा हा शासन निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केलेल्या राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय दर्जाची महत्त्वाची स्थळे, तीर्थक्षेत्र परिसर विकास आराखडे यांची व्याप्ती आणि स्वरूप लक्षात घेऊन संबंधित आराखडे नियोजन विभागामार्फत राबवण्यात येतात. स्थानिक पातळीवरील सर्व संबंधितांशी चर्चा करून श्रीक्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखडा व लागणारा निधी याचा आराखडा धाराशिवचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने तयार केला आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या माध्यमातून ६ मे २०२५ रोजी चौंडी येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यास मान्यता धेण्यात आली. त्यानंतर दोन आठवड्यातच या आराखड्यास प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय नियोजन विभागाने जारी केला आहे. या शासन निर्णयानुसार विकास आराखड्यातील कामे करताना ऐतिहासिक वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या संस्थांकडून ही कामे करून घ्यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. नियोजन विभागाने तत्परतेने जारी केलेल्या या शासननिर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे देवीभक्तांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## अजित पवारांना मोठा धक्काः राष्ट्रवादीच्या ७ आमदारांनी साथ सोडली, अचानक दुसऱ्या पक्षात विलिनीकरण!

नागालँड: नागालँडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे सात आमदार सत्ताधारी नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी (एनडीपीपी) मध्ये सामील झाले आहेत. या विलिनीकरणामुळे मुख्यमंत्री नेफ्यू रिओ यांच्या नेतृत्वाखालील एनडीपीपीने विधानसभेत पूर्ण बहुमताचा आकडा गाठला आहे.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर, नागालँड युनिटने अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला पाठिंबा दिला होता. यानंतर आता हे आमदार एनडीपीपीमध्ये सामील झाल्यानं राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. तसंच अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या नागालँडमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (एनसीपी) सर्व सात आमदार शनिवारी सत्ताधारी एनडीपीपीमध्ये सामील झाले. यामुळे मुख्यमंत्री नेफ्यू रिओ यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला ६० सदस्यांच्या विधानसभेत पूर्ण बहुमत मिळालं आहे. या विलीनीकरणामुळे नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी (एनडीपीपी) च्या आमदारांची संख्या २५ वरून ३२ झाली आहे. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत, एनडीपीपी आणि त्यांचा मित्रपक्ष भाजपनंतर राष्ट्रवादी काँग्रेस राज्यातील तिसरा सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला होता. त्यावेळी त्यांनी १२ जागा जिंकल्या होत्या.

## संपादकीय

# पर्यावरण आपल्याच हातात

पर्यावरण हा शब्द परि आणि आवरण या दोन शब्दांनी बनलेला आहे ज्यामध्ये परि म्हणजे आपल्या अवतीभवती किंवा आपल्या सभोवताली. आवरण म्हणजे आपल्या सभोवताल जे व्यापले आहे. पर्यावरण हे वातावरण, हवामान, स्वच्छता, प्रदूषण आणि झाडांपासून बनलेले आहे.सर्व गोष्टी म्हणजेच पर्यावरणाचा आपल्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंध आहे आणि आपल्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होतो. मनुष्य आणि पर्यावरण एकमेकांवर अवलंबून आहे. प्रदूषण किंवा झाडांची कमतरता या पर्यावरणीय प्रदूषणाचा थेट परिणाम मानवी शरीरावर आणि आरोग्यावर होतो.मानवाच्या चांगल्या सवयी जसे की झाडांची जोपासना करणे. प्रदूषण रोखणे,स्वच्छता राखणे या साऱ्या गोष्टी पर्यावरणाला प्रभावित करतात. मानवाच्या वाईट सवयी जसे की

पाणी घाण करणे, पाण्याचे अपव्यय करणे,झाडे कापणे,या गोष्टी पर्यावरणाला प्रभावित करतात.याचा परिणाम म्हणजे नैसर्गिक आपत्तींना सामोरी जावे लागते. संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केलेला हा दिवस जागतिक पातळीवर पर्यावरणा विषयी जागरूकता आणण्यासाठी साजरा केला जातो. याची सुरुवात १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून ते १६ जून या कालावधीत आयोजित जागतिक पर्यावरण परिषदेत केली. पहिला जागतिक पर्यावरण दिन ५ जून १९७३ रोजी साजरा करण्यात आला. पर्यावरणाच्या जैविक घटकांमध्ये सूक्ष्मजीवांपासून कीटक, प्राणी आणि वनस्पती आणि सर्व जैविक क्रियाकलाप आणि त्यांच्याशी संबंधित प्रक्रियांचा समावेश आहे.

वातावरणाच्या अजैविक घटकांमध्ये निर्जीव घटक आणि त्यांच्याशी संबंधित प्रक्रिया असतात, जसे की पर्वत, खडके, नदी, वारं आणि हवामान घटक. सर्वसाधारणपणे, हे सर्व जैविक आणि अजैविक घटक, तथ्य, प्रक्रिया आपल्या जीवनावर परिणाम पाडणाऱ्या घटनांचा समावेश असलेले एक घटक आहे. हे आपल्या सभोवताली व्यापलेले आहे. आपल्या जीवनातील प्रत्येक प्रसंग या पर्यावरणावर अवलंबून आहे आणि तसेच ते संपादित केले जाते. मानवांनी केलेल्या सर्व कृतींचा पर्यावरणावर थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम होतो. अशा प्रकारे, जीव आणि पर्यावरणामध्ये देखील एक संबंध आहे,जो परस्पर अवलंबून आहे. मानवी हस्तक्षेपाच्या आधारे, पर्यावरणाची दोन भागात विभागणी केली जाऊ शकते, पहिली नैसर्गिक किंवा नैसर्गिक वातावरण आणि मानवनिर्मित वातावरण. ही विभागणी नैसर्गिक प्रक्रिया आणि परिस्थितीत मानवी हस्तक्षेपाच्या अत्यधिक प्रमाणात आणि कमतरतेनुसार आहे. प्रदूषण, हवामान बदल इत्यादी पर्यावरणीय समस्या मानवाला त्यांच्या जीवनशैलीबद्दल पुनर्विचार करण्यास प्रवृत्त करत आहे आणि आता पर्यावरण संरक्षण आणि पर्यावरण व्यवस्थापन करणेआवश्यक आहे.आज आपल्याला सर्वात जास्त गरज आहे ती म्हणजे सर्वसामान्यांना आणि सुशिक्षित वाचकांना पर्यावरणाच्या संकटाची जाणीव करुन देण्याची आणि पर्यावरणाच्या रक्षणाची प्रतिज्ञा घेण्याची.आपण आपल्या पर्यावरणाचा सांभाळ करू.अशी प्रतिज्ञा घेऊ या.आणि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करू या.

पर्यावरण दिनानिमित्त आपल्या हाती असलेले कार्य आपल्या घरुनच सुरुवात करुया. पुन्हा पुन्हा वापरात येऊ शकर्णाया वस्तू जसे पेपर, काचेच्या वस्तू, अल्युमिनियम, मोटरऑईल अशांची पनुर्निर्मिती करुया. हातांनी जे काम करु शकतो ते काम इलेक्ट्रीक उपकरणा– शिवाय करुया. शक्य असल्यास गरम पाण्याऐवजी थंड पाण्याचा वापर करुया या. प्लॅस्टीक पिशव्यांऐवजी परत परत वापरता येर्णाया कागदी पिशव्या वापरु या. अन्न आणि भाजीपाला प्लॅस्टीकमध्ये न ठेवता अल्युमिनियम पापुर्द्यात ठेवूया. पाण्याचा गैरवापर करणे थांबवूया. घरातील रुम हिटरचा वापर न करता स्वेटर घालून इलेक्ट्रीक ऊर्जेचा वापर टाळूया. गरज नसल्यास घरातील टी.व्ही., बल्ब तसेच अन्य इलेक्ट्रीक उपकरणाचा वापर थांबवूया. घरातून बाहेर पडताना पाण्याचा हिटर, पंखा, विजेचा दिवा बंद करुया. याशिवाय आणखी एक पाऊल पुढे जाऊन, पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचे काम करर्णाया एखाद्या स्वयंसेवी संस्थेचे सभासद होऊन पर्यावरण वाचविण्यासाठी विविध मोहिमा राबवूया आणि या माध्यमातूनच जनजागृती करुया.

# बंजारा संघटनांनी लख्खीशाह बंजारा, संत हत्तीरामच्या संस्थानाच्या संपतीचा हिशोब मागावा

## - प्रा डॉ अशोक पवार, स्वर्णिम बंजारा इतिहासकार

प्राचीन कालखंडापासून बंजारा अदिम जमातीचा धनी, दाणी, न्यायदानी व बलिदान चा इतिहास आहे. ज्यांनी विश्वातील सर्व धर्मीयांसाठी तन–मन–धनाने योगदान दिले. मख्खली गोशाल बंजारा होता .त्याचे संदर्भ बौद्ध व जैन धर्मातील साहित्यात अढळते. अनाथपिंडक बंजारा सार्थवाहकाने श्रावस्ती सारखे बौद्ध विहार बांधून दिले. ज्या ठिकाणी गौतम बुद्धाने आयुष्यातील सर्वाधिककाळ १९ वर्षावास वास्तव्य केले. तपसू भलिक सार्थ वाहक बंनजारांने आयुष्यातील व्यापारातून कमावलेली संपूर्ण संपत्तीचे दान करून ब्रह्मदेशातील यगूंनचा सर्वात मोठा स्वर्णिम पॅगोडा बांधून दिला. जैन धर्मियांसाठी धनदान केले. लहान मार्गाने देश–विदेशात व्यापार करून आपल्या कमावलेल्या संपत्तीतून दुष्काळ व रोगराईच्या काळात जगाचे पालन पोषण केले. जगभर लहान मार्गाचा शोध लावून, देशविदेशातील सर्व राजा महाराजांना रसद पुरवून योगदान दिले. सोळाव्या शतकात शिखी इतिहासामध्ये जगातील सर्वात मोठा लोहगडचा किल्ला बांधणारे दिल्लीच्या जमिनीचे मालक लख्खीशाह बंजाराचे गुरुनानक देव पासून गुरुगोविंद सिंहजी पर्यंत तत्पपश्यातही परिवाराचे पारिवारिक संबंध होते. त्यांच्या परिवारांनी मोहर काळात १०६ पारिवारिक बलिदान दिल्याचा इतिहास आहे. बादशाह औरंगजेबा ला देखील रसद पुरवून सहकार्य करणारे लक्कीशाह बंजारा च्या मालकीची दिल्लीची सबंध जागा होती. चांदणी चौकात हिंद की चादर म्हणून जगप्रसिद्ध असलेले शिखांचे नववे गुरु गुरु तेग बहादुरचा शिरच्छेद बादशाह औरंगजेबाद्वारे करण्यात आला होता. बादशाह औरंगजेब्राचा हुकूम असतानही गुरुचे पार्थिव देहाला दिल्ली रक्काबगंज येथिल स्वतः चा घराला आग लावून, दहा संस्कार केला होता. बालाजी संस्थानासह देशातील पंधरा राज्यातील २१ मठांची हजार एकर संपत्ती हत्तीराम बाबा यांच्या मालकीची आहे. ब्रिटिशांनी अशा धनी,दाणी, न्यायदानी व बलिदानी बंजारा समाजावर त्यांचा आर्थिक साम्राज्यवाद पसरविण्यासाठी जन्मजात गुन्हेगार ठरविले होते. बंजारा जमातीने भारतालाच नव्हे तर जगाला लहान मार्गाने व्यापार करून, जगातील सर्व प्रमुख धर्मीयांना भरपूर काही दिले



आहे. परंतु बंजारा जमातीसाठी इतर धर्मियांचे काय योगदान आहे? असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर आज तागायत मला सापडले नाही! मानवतावादी इतिहास उभा केलेली,बंजारा जमात दारिद्र्याच्या खाईत सापडल्या गेली आहे. एका जमातीला देशभर विविध प्रवर्गामध्ये विभाजित करून, त्याची शक्तीहीन केलेल्या राजकारणांना धडा शिकविण्याची आज वेळ आलेली आहे. त्यामुळे तथाकथित संघटनांनी आपसातील हेवेदावे सोडावेत. त्यांच्या मोरख्यांनी बंजारा समाजाच्या पूर्वजाची हक्काची जमीन, संपत्ती वर आपला हक्क सांगून आपल्या न्याय हक्काची चळवळ राबवावी. असा महत्त्वपूर्ण मोफत कानमंत्र, २० खंडामध्ये बंजारा समाजाचा स्वर्णिम इतिहासाचे लेखन करणारे इतिहासकार प्रा. अशोक पवार यांनी दिला.

गंगाखेड येथे आशिया खंडातील सर्वात श्रीमंत व्यापारी, दानशुर, महानायक बाबा लखिशहा बणजारा यांच्या ३४५ व्या स्मृतीदिनानिमित्त भारतात प्रथमच भव्य व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले.

या व्याख्यान मालेचे अध्यक्ष मा. दिगंबरजी राठोड ( बणजारा कर्मचारी संघटनेचे संस्थापक) हे होते,तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मोतीरामजी राठोड (जेष्ठ साहित्यिक तथा सेवानिवृत्त गट शिक्षण आधिकारी ) हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. अशोक पवार ( जेष्ठ साहित्यिक तथा संचालक, वसंतराव नाईक संशोधन केंद्र, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ,छ. संभाजी नगर) हे होते.

या व्याख्यानमालेस प्रमुख पाहुणे गणेश करमटोट (चंद्रपूर ) बाबुराव पवार साहेब, ॲड. साधनाताई राठोड, प्रा.डि.एस. जाधव सर, डिगांबर राठोड (से.निवृत म. पो.) किशन नाईक, निलाकांत जाधव, संदिप राठोड, स्वप्निल राठोड, विकास पवार (परळी), कृष्णकुमार राठोड (अंबाजोगाई) हे मान्यवर उपस्थित होते.

सर्व प्रथम बाबा लखिशहा बंजारा,संत सेवालाल महाराज वसंतरावजी नाईक साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रमेश पवार सर व अंबादास चव्हाण यांनी केले. दोन मिनिटे मौन पाळुन पहलगाम हल्लूयात बळी पडलेल्या देसवाशियांना व शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व नंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. जय जय महाराष्ट्र माझा या राज्य गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

मान्यवरांच्या हस्ते मोतीराम रुप सिंग राठोड सर लिखित झुनकी या कथासंग्रहाचे व सखाराम व्यंकटी जाधव लिखित मार धाटी मारो पेनो या साहित्यकृतीचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.साहित्यिक बी.सुग्रीव यांनी प्रास्ताविक केले व कवी नारायण आडे यांनी आपलीं छानशी कविता सादर केली. प्रा.डॉ. आशोक पवार सरांनी शिख व हिंदू धर्मासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांच्या जिवनावर प्रकाश टाकले. मोतीराम राठोड सरांनी बंजारा समाजाच्या राजकीय परिस्थिती व समाज व्यवस्था या विषयावर दुजोरा दिला. शेवटी मा.दिगंबर राठोड सरांनी बंजारा समाजावरील सांस्कृतीक आक्रमणावर प्रकाश टाकत आपले अध्यक्षीय भाषण संपविले.

विलास राठोड सरांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले. सुग्रीव राठोड सर, डॉ. देविदास चव्हाण साहेब, सखाराम जाधव, दत्ता पवार , कवी उत्तम महाराज, ईश्वर राठोड, सुभाष राठोड, नारायण आडे, अनिल राठोड, नवनाथ चव्हाण व परीसरातील बंजारा बांधवांच्या सहकार्याने ही प्रथम व्याख्यान माला शांततेत पार पडली.या व्याख्यानमालेस मोठ्या संख्येने समाजांतील बंधु–भगीनी व युवा वर्ग उपस्थित होता

# कृषि विद्यापीठांनी पिकांच्या उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता वापराचे मॉडेल तयार करावे – मुख्यमंत्री

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू झाला आहे. राज्यातील कृषि विद्यापिठांनी प्रमुख पिकांच्या उत्पन्न वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापराचे मॉडेल तयार करण्याबाबत संशोधन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले. वातावरणीय बदल, कीड व्यवस्थापन, तसेच पावसाचा खंड पडल्यानंतरही तग धरू शकणारे वाण शेतकरी बांधवांना उपलब्ध देण्याबाबतचे संशोधन अपेक्षित असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्यावतीने आयोजित संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या ५३ व्या बैठकीचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, पालकमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार संजय जाधव, आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, राहुल पाटील, रत्नाकर गुट्टे, राजेश विटेकर यांच्यासह कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषि आयुक्त सुरज मांढरे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, संशोधक संचालक डॉ. खिजर बेग, डॉ. किशोर शिंदे उपस्थित होते. प्रारंभी स्वर्गीय वसंतराव नाईक, महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, केंद्र शासनाने राज्यात आयसीआरच्या माध्यमातून सुरु केलेल्या नव्या योजनेत शेतीशी सबंधित विविध शास्त्रज्ञ, या क्षेत्रात कार्यरत संस्था, अधिकारी एकत्रितपणे शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाणार आहेत. संशोधक आणि शेतकरी यांच्यामध्ये या माध्यमातून एक नवीन नाते निर्माण होईल. या अंतर्गत पुढील पंधरा ते वीस दिवस एकात्मिक कार्यक्रम संपूर्ण देशामध्ये राबविण्यात येत असून, या कार्यक्रमाची सुरुवात आपल्या महाराष्ट्रापासून होत आहे ही महत्त्वाची बाब आहे. या माध्यमातून संशोधक एका दिवशी तीन ते चार गावांमध्ये जातील व शेतकऱ्यांशी बांधावर जावून संवाद साधतील. या संवादातून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यास मदत होणार आहे. केंद्र सरकारने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शेती क्षेत्राच्या विकासासाठी हाती घेतलेला हा उपक्रम नक्कीच उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुखमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

वातावरणीय बदलामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने उभा राहिली आहेत. बदलत्या तंत्राचा वापर करत गुंतवणूक आधारित शेती आपल्याला करावी लागणार आहे. संरक्षित शेतीसाठी शेतीमध्ये गुंतवणूक वाढवावी लागेल. शासनाच्या वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून शेतकरी बांधवांसमोरील अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. वातावरणीय बदलामुळे निर्माण होणाऱ्या पावसातील खंड सारख्या संकटात तग धरू शकेल, असे वाण विकसित करावे लागणार आहे. पावसाचा खंड, कीड व्यवस्थापन, वातावरणीय बदलात पावसाचा खंड आदी संकटात तग धरू शकणारे वाण विकसित करण्यासाठी कृषि विद्यापीठांमध्ये संशोधन होणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी आपल्याला कामे करावे लागेल तसेच शेती क्षेत्रात संशोधन करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषि विद्यापीठांनी प्रोत्साहन देण्याची गरज आहे. शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू झाला आहे. हा वापर वाढविण्यासाठी कृषि विद्यापीठांनी 'मिशन कृत्रिम बुद्धिमत्ता' सुरु करावे. या माध्यमातून प्रमुख पिकांच्या उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता वापराचे नवे मॉडेल विकसित करावे. यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

# गत पावसाळ्यात शालेय विद्यार्थी नोकरदार व्यापारी आजारी वयोवृद्ध बालके नागरिकांचे झाले होते हाल



**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील कानडगाव-सुलतानपूर साठी तथा बाजार सावंगी सर्कल साठीचा रस्ता तथा गिरिजा नदीवरील पूल काम आखेर पुर्ण केल्याने ये जा साठी खुला ( बहाल) करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत पुल काम गुत्तेदार करवी हाती घेण्यात आले होते कामात दिरंगाई चालढकल होत असल्याने गतवर्षी सर्कल तथा विशेष करुन कानडगाव येथील नागरिकांना पुला अभावी हाल झाले होते नागरिकाचे सतत पाठपुरावा करत विभागाला कामा संदर्भात अवगत केले होते.

याची दखल साबांवि उप अभियंता कोलते यांनी गंभीरपणे घेवून नागरिकांचा त्रास बघता तातडीने काम करण्या संदर्भात आदेशीत केले होते आखेर पुलाचे काम पूर्ण होऊन नागरिक तथा वाहनधारकांसाठी पुल रस्ता खुला करण्यात आल्याने नागरिक वाहनधारक शेतकरी ग्रामस्थांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# विभागीय आयुक्त दिलीप गावडे सेवानिवृत्त शासकीय सेवेत सर्वसामान्यांसाठी काम केल्याचा आनंद- दिलीप गावडे



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मराठवाड्यात विभागीय आयुक्त म्हणून काम करताना एक दिवस गावकऱ्यांसोबत, सस्ती अदालत, संवाद मराठवाड्याशी असे उपक्रम राबवून सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला. शासकीय सेवेत विविध पदावरून सर्वसाम ान्यांसाठी काम केल्याचा आनंद मिळाला अशी भावना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी व्यक्त केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून विविध उपक्रम लोकाभिमूख करणारे अधिकारी अशी ओळख असणारे श्री. गावडे आज (३१ मे) रोजी नियत वयोमानानूसार सेवा निवृत्त होत आहेत.

विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात आयोजित निरोप समारंभात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अंकित, अपर आयुक्त विजयसिंह देशमुख, डॉ. अनंत गव्हाणे, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, सहआयुक्त (नगर परिषद प्रशासन) देविदास टेकाळे, उप आयुक्त (आस्थापना) सुरेश बेदमुथा, विभागीय आयुक्त श्री. गावडे यांच्या पत्नी मनिषा गावडे यांच्यासह प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

श्री.गावडे म्हणाले, शासकीय सेवेत उपजिल्हाधिकारी पदावरून सुरूवात केली असून राज्यातील विविध विभागात ३५ वर्ष सेवा केली आहे. सर्वसामान्य माणसासाठी काम करताना समर्मित भावनेने काम केले आहे. पुणे, सांगली, सातारा, अहिल्यानगर तसेच विदर्भातही काम करण्याची संधी मि ळाली. सेवानिवृत्तव होताना मराठवाड्यात सेवा करण्याची संधी मिळाली, व या सेवेत कामाचा मोठा आनंद मिळाला. विभागातील प्रश्न सोडविण्यासाठी कमी वेळेत ऑनलाईन उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. सेवेत समवेत काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी तसेच नागरिकांनी सहकार्य केले असल्याचे सांगताना श्री. गावडे यांनी सेवा कालावधीतील प्रसंगानिहाय आपले अनुभव विषद केले. यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विभागनिहाय अधिकारी यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी अपर आयुक्त सुरेश वेदमुथा यांनाही सेवानिवृत्तीनिमित्त निरोप देण्यात आला. श्री वेदमुथा यांनी मराठवाड्यात सर्व एकत्रितपणे काम करतात, याचा अनुभव आपल्याला आल्याचे सांगितले. पुणे जिल्हयातील गावडेवाडी सारख्या छोटे गाव ते विभागीय आयुक्त असा आयुक्तांचा प्रवास आमच्यसाठी प्रेरणा देणारा असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक अपर आयुक्त श्री परदेशी यांनी केले, त्यांनी श्री गावडे यांच्या सेवाकालावधी व त्यांनी राबविलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# मागील अनेक वर्षापासून बंद पाणंद रस्ता, महसूल व पोलीस विभाग तथा शेतकऱ्यांच्या समंजसपणाने मोकळा



**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील मौजे ताजनापूर शिवारात गत अनेक वर्ष पासून बंद पडून असलेला पाणंद रस्ता आखेर महसूल विभाग पोलिस विभाग तथा शेतकरी ग्रामस्थांच्या सहकार्य समंजसपणा मुळे मोकळा करण्यात आला व त्याम ुळे शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. खुलताबाद तालुक्यातील मौजे ताजनापूर येथील गेल्या अनेक वर्षापासून बंद असलेला पाणंद रस्ता येथील गट नंबर २२७ ला जाण्यासाठी शेत रस्ता बुधवारी महसूल व पोलीस बंदोबस्त मोकळा करण्यात आला. हा शेतरस्ता परिसरातील सर्व शेतकऱ्यांच्या सामंजस्याने मोकळा करण्यात आला. तहसीलदार स्वरूप कंकाळ खुलताबाद यांच्या आदेशाने व मार्गदर्शन मुळे बाजार सावंगी मंडळाचे मंडळ अधिकारी परदेशी व ग्राम महसूल अधिकारी चन्द्रकुमार ठाकूर , बाजार सावंगी सजाचे ग्राम महसुल अधिकारी नारायण पट्टे यांनी सर्व शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सामंजस्याने पाणंद रस्ता मोकळा केला.

सदरील पाणंद रस्ता गट न २०२, २०८, २०९, २१४, २१५,२१७, या गटातून मोकळा करण्यात आला या मुळे शेतकऱ्यांना अनेक वर्षांपासून बंद असलेल्या रस्ता मोकळा झाल्याने मोठा दिलासा मिळाला. यावेळी बंदोबस्त पोलिस मुख्य जमादार नवनाथ कोल्हे, दिलीप बनसोड, विनोद बिगोत. संजय कोतकर, साईनाथ काळे, दीपक काळे, दिनेश काळे, राहुल काळे, कारभारी काळे, ज्ञानेश्वर सोनवणे, काकासाहेब काळे, दत्तू काळे. यांचेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# तब्बल तीस वर्षानंतर भेटले वर्गमित्र




**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद तालुक्यातील गदाना येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू हायस्कूल गदाना प्रशालेमध्ये १९९८ साली दहावी वर्गात शिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळा मंगळवारी (दी. २७) पार पडला. यावेळी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा मिळाल्याने आणि आपल्या गुरुजनांच्या व वर्गमित्र मैत्रिणींच्या एक दिवसीय सहवासाने प्रत्येक जण भाऊक झाला होता.

या कार्यक्रमासाठी न्यू हायस्कूल गदाना प्रशालेचे तात्कालीन शिक्षक व सध्याचे मुख्याध्यापक आर.आर. पवार, सेवानिवृत्त शिक्षक बापू वरकड, बाबासाहेब वाकळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित येत आपल्या गुरुप्रती कृतज्ञता म्हणून गुरु पूजन केले, उपस्थित माजी विद्यार्थी व तात्कालीन शिक्षकांच्या मनोगतातुन तीस वर्षांपूर्वीच्या आठवणी जसाच्या तसा डोळ्यासमोर उभा राहिल्या.

माजी विद्यार्थ्यांनी स्नेह भेटीची आठवण म्हणून आपल्या शिक्षकांच्या हस्ते शाळेच्या प्रांगणात बॉटल्स पाम रोपांचे वृक्षारोपण केले. सर्वांच्या स्नेहभोजनाची व गुरुजनांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था शाळेच्या प्रांगणात करण्यात आली होती.

यावेळी पंचक्रोशीतील गदाना, गोळेगाव, सोनखेडा, सुलतानपूर, देवळाना, ममनापूर, बोरवाडी व इतर गावातील १९९८ च्या दहावी वर्गाच्या बॅचमधील ८० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते. स्नेह मिलन यशस्वीतेसाठी विजय चव्हाण, निलेश सोनवणे, असलम बेग (पानी फाऊंडेशन समन्वयक फुलंब्री) कैलास कछवा, ज्योती चव्हाण, गुलाब ठेंगडे आलिम शहा व सर्वच विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला.

# गुंठेवारी सवलतपूर्वी सारखीच ठेवा मनपाचे उत्पन्न हजार कोटीच्या पुढे जाईल - डॉ राजेंद्र दाते पाटील

## जाचक साइड मार्जीन दंड कारवाई रद्द करून सातबारा-पी आर कार्ड द्या- नगर विकास २ चे सचिव डॉ. गोविंदराज यांना निर्देश जारी!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर मनपा क्षेत्रात मनमानी पद्धतीने आकारण्यात येणारी गुंठेवारी शुल्क रद्द करून साइड मार्जिन मधील जागा न सोडल्यास दहा टक्के दंड करणारी कारवाई तात्काळ मागे घेण्याचे निर्देश व्हावे आणि गुंठेवारी प्रमाणपत्र धारकांच्या नावे सातबारा व पी आर कार्ड वर नोंद घेऊन या मालमत्तेवर बांधकाम व इतर आवश्य नियमाधीन कर्ज उपलब्ध व्हावे अशी लोकहिताची मागणी दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी निवेदन देऊन केली आहे.

त्यांनी एक अभ्यासु असे सविस्तर निवेदन सादर केले आहे. या पुर्वी मान्य केलेली मनपा गुंठेवारी रेडी रेकनर दरात ५० टक्के सवलत सुविधा कायम ठेवावी,रेडिरेकनर दराच्या प्रमाणात शंभर टक्के शुल्क आकारण्यात येत असल्याने गुंठेवारीला मिळणारा प्रतिसाद कमीच होताना दिसत आहे. पालिकेने पूर्वीप्रमाणे रेडिरेकनर दराच्या किमान ५० टक्के सवलत देण्याचे आदेश जनहितार्थ निर्गमीत व्हावेत अशी मागणी त्यांनी केली असुन सविस्तर असे सोळा मागण्या त्यांनी लेखी स्वरूपात केल्या आहेत. पूर्वीप्रमाणे सवलत जाहीर केल्यास गुंठेवारी नियमिती करणाला प्रतिसाद मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

९ जुलै २०२१ गुंठेवारी भागा तील मालमत्ता नियमितीकरणा साठी नगररचना विभागाने ५१ वास्तू विशारदांचे पॅनल नेमले होते, या वास्तू विशारदां मार्फत येणाऱ्या संचिका स्विकारल्या जातहोत्या. दीड हजार चौरस फुटांच्या आतील बांधकामांना नियमित करण्यासाठी सुरूवातीला रेडीरेकनर दराच्या ५० टक्के दर आकारण्यात आला होता त्यामुळे शहरातील गुंठेवारी भागातील मालमत्ता धारकां कडून नियमिती करणाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता मात्र नंतर रेडीरेकनर दराची ही सुट टप्प्याटप्प्याने कमी करण्यात आली. आता तर वास्तू विशारदांचे पॅनल देखील नसुन मे








२०२२ नंतर १००टक्के रेडीरेकनर दरआकारण्यात येत आहेत. यामुळे गुंठेवारी नियमिती करणाला मिळणारा प्रतिसाद घटतच गेला असुन संचिका दाखल होण्याचे प्रमाणही कमी झाले आहे जुनी पद्धत व सवलत देण्याचे निर्देश तत्काळ जारी करून सुधारीत शासनादेश जारी व्हावा अशी मागणी करण्यात आली आहे.

सध्याची स्थिती विचारात घेणे आवश्यक असुन गुंठेवारी साइड मार्जिनच्या दंडा पोटी १०% अधिक भुर्दंड मोकळ्या प्लॉटच्या जमीन शुल्कात १ टक्का सूट शासन निर्णयानुसार या वर्षापासून मोकळ्या जागा,घरे नियमित करण्यासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २०२१ नुसार शुल्क भरून नियमित केली जात आहे. ६०० स्क्वेअर फूट क्षेत्रा वरील घर गुंठेवारी करताना सुमारे २७ हजार रुपयांची वाढ झाली असुन हा भुर्दंडच आहे.मनपा आयुक्तांनी शुल्क कमी करण्या ऐवजी शुल्का मध्ये दंड आकारून वाढ केली आहे या मुळे ही बाब जनविरोधी ठरत असून महानगर पालिका क्षेत्रात भूखंड विकासा साठी आणि इतर बांधकामांच्या परवानग्यां साठी सुधारित शुल्क आकारणी केली असल्याची बाब सुद्धा जनते मध्ये नाराजी पसरवणारी आहे. ६०० चौ.फुटाचा प्लॉटच्या समोरील बाजूच्या १० फूट आणि मागील बाजूने ५ फूट अशी एकूण २४५ चौ. फूट मार्जिनची जागा सोडणेअनिवार्य करणे म्हणजे मुळातच जागा कमी त्यात या अटी सर्व सामान्य गोरगरीब जनतेवर अन्याय कारक ठरत आहे.यात आश्चर्य म्हणजे प्रशमन शुल्क आदी घटकां नुसार दर आकारण्यात येत आहे.या सुधारणे नुसार ६०० स्क्वेअर फूट क्षेत्रासाठी वार्षिक बाजार मूल्या नुसार शुल्क निश्चित करण्यात आले आहे हे करणे देखील अन्यायच ठरला आहे. त्यामुळे ४एप्रिल २०२५ पासून मनपा मध्ये दाखल झालेल्या गुंठेवारी प्रस्तावाच्या चलनामध्ये अन्याय कारक अशी मोठी वाढ झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे मनपा क्षेत्रात या मालमता बाबत नागरिकांना ७/१२ नोंदी ना पी आर कार्ड नोंदी घेऊन ते तात्काळ देण्यात यावेत. मनपा क्षेत्रात ०१ ते १५०० ते २००० वर्ग फुटांच्या मोकळ्या जागेचे गुंठेवारी करतांना नाम मात्र शुल्क आकरावे.गुंठेवारी करतांना जुने दस्तावेज तथा जुन्या नोंदणीचे (रजिस्ट्रीचे) दस्तावेज या सह नव्याने करण्यात आलेले दस्तावेज यांना सुद्धा ग्राह्य मानून त्याची खरेदी विक्री कायदेशीर असल्याचे उल्लेख असावा तसेच सर्वच बांधकाम नसलेले ओपन प्लॉटची गुंठेवारी करतांना नाममात्र शुल्क आकारून त्यांना गुंठेवारी प्रमाणपत्र द्यावीत आणि मनपाचे बांधकाम शुल्क बांधकाम परवानगी घेताना आकारावे हा सुद्धा या सुधारीत शासन निर्णया मध्ये उल्लेख असावा अशी स्पष्ट मागणी शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी करतांना वित्तीय संस्थानी सुद्धा याच प्रमाणपत्रा वर पात्र अर्जदारांना कर्ज तथा पत पुरवठा करावा असा व या बाबींचा सुद्धा स्पष्ट उल्लेख असावा आणि या प्रमाणे नवा शासनादेश निर्गमीत होऊन मागणी जनहितार्थ तत्काळ मंजुर करून तसे नवे शासन निर्णय त्वरित जारी करून सर्व सामान्य गोरगरीब जनतेला न्याय द्यावा अशी मागणी पत्रात नमुद केले आहे. या मागणीचे गांभीर्य आणि जनहीत पहाता मुख्यमंत्र्यांनी निवेदनातील मागणी प्रमाणे योग्य त्या कारवाई साठी राज्य शासनाच्या नगरविकास विभाग २ चे सचिव डॉ गोविंदराज यांना निर्देश जारी केले असल्याचा मेल जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना प्राप्त झाला आहे.

# छत्रपती संभाजीनगर शहर पाणी पुरवठा योजना ऑक्टोबर अखेरपर्यंत कार्यान्वीत करा - मुख्यमंत्री

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर शहराची पाणी पुरवठा योजना सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून ऑक्टोबर अखेरपर्यंत कार्यान्वीत करा. तसेच सर्व प्रलंबित कामे तातडीने मार्गी लागण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. योजना १०० टक्के पूर्ण झाल्यानंतरच समाधान होणार आहे. ठेकेदारांना काम करताना येणाऱ्या अडचणी महानगरपालिका आयुक्तांनी स्वतः लक्ष घालून सोडवाव्यात आणि ठेकेदारांनीही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक यंत्र सामग्री आणि मनुष्यबळाचे नियोजन करावे अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे छत्रपती संभाजीनगर पाणी पुरवठा योजनेची आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

पाणी पुरवठ्यासाठी जॅकवेल महत्वाचे असून त्याचे काम ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून पाणी उपसा सुरू करण्याच्या सूचना देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या योजनेतील २६ एम एल डी पाणी पुरवठा करणारा टप्पा जून अखेरपर्यंत पूर्ण करावा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अपूर्ण असलेले काम लवकर होण्याच्या दृष्टीने पूर्व अभियांत्रिकी पद्धतीने काम करण्यास ठेकेदारास तातडीने मान्यता द्यावी. पाईप लाइन टाकण्याच्या कामात गॅप आहेत. ते पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेने १५ जून नंतर शटडाउन घ्यावा आणि ठेकेदारांनी ते काम ऑगस्ट अखेर पर्यंत पूर्ण करावे. आरओडब्लूचे काम एक आठवड्यात मार्गी लावावे, ठेकेदाराने किमान ३५ ईएसआर आणि जीएसआर पूर्ण करून द्याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या योजनेचे इतके टक्के काम पूर्ण अशी उत्तरे अधिकाऱ्यांकडून अपेक्षित नाहीत. अशा उत्तराने समाधान होणार नाही.

१०० टक्के काम पूर्ण झाल्यानेच समाधान होणार आहे. या योजनेतील पाणी पुरवठ्याच्या टाक्या तातडीने कार्यन्वीत करण्यासाठी ठेकेदाराने नियोजन करावे. ऑगस्ट ते सप्टेंबरपर्यंत या पाणी टाक्यांची कामे पूर्ण करावीत. यामध्ये येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महानगरपालिकांनी समन्वयाने काम करावे. कामामध्ये खंड पडू नये यासाठी महानगरपालिकेला ८२२ कोटी रुपयांचा कर्ज निधी उभारण्याची मंजुरी तातडीने द्यावी. तसेच याच्या व्याजामध्ये असलेला जास्तीचा दर फरक शासन स्तरावरून भरून द्यावा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ठेकेदाराने वेळेत काम पूर्ण न केल्यास त्याला काळ्या यादीत टाकण्यात येईल. पोलिस, महानगर पालिका आणि जीवन प्राधिकरण यांनी सामन्याने काम करून ही योजना वेळेत पूर्ण करावी. पाणी पुरवठा करणाऱ्या टाक्यांचे काम तातडीने पूर्ण करावे. यावेळी पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाट, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, अश्विनी भिडे, यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# सम्राट पृथ्वीराजसिंह चौहान यांची ८५९वी जयंती महाराणा प्रतापसिंह सार्वजनिक जिल्हा उत्सव समितीच्या वतीने साजरी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह सार्वजनिक जिल्हा जयंती उत्सव समितीच्या वतीने २९ मे २०२५ रोजी सायंकाळी ०५:३० वा. स्वाभिमानी राष्ट्रपुरुष सम्राट पृथ्वी सिंह चौहान यांच्या ८५९ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम महाराणा प्रताप स्मारक उद्यान, कॅनोट प्लेस, सिडको येथे आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले.

यावेळी विशालसिंह चौहान यांनी पृथ्वीराजसिंह चौहान यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

प्रतापसिंह राजपूत प्रमुख अतिथी होते. यावेळी समितीचे अध्यक्ष सुभाष महेर , उपाध्यक्ष एलडी ताटू, सहसचिव वासुदेव राजपूत, भावसिंग बैनाडे, नारायण महेर, जगतसिंग परिहार, सुहास बोर्ड, विजय त्रिभुवन, अषिश राजपूत, हरिश्चंद्र राजपूत, भाऊसाहेब वाघमोडे यांच्यासह उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# स्मृतीशेस दिलीप सांडूजी रगडे यांच्या जयंतीनिमित्त धम्मरत्न मित्रमंडळातर्फे विनम्र अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

स्मृतीशेष दिलीप रगडे सर यांच्या जयंतीनिमित्त धम्मरत्न मित्र मंडळ तर्फे अभिवादन करण्यात आले. तथागत भगवान गौतम बुद्ध बोधी सत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्मृतीशेष दिलीप सांडूजी रगडे यांच्या प्रतिमाचे पूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा धम्म रत्न मित्रमंडळाचे कार्याध्यक्ष प्रकाश सोनवणे यांनी केले.

ते पुढे म्हणतात की वाढदिवस आपण सर्वांचेच साजरे करतो दिलीप रगडे यांनी ही अशी व्यक्ती होती की जेव्हाही आपण कुठलाही कार्यक्रम करत असतो त्यावेळेस आपण रगडे यांना विसरत नाही. कारण ते सुख दुःखात नेहमीच उभे राहत असे म्हणून आज आपण त्यांची जयंती साजरी करत आहोत.



मंडळाचे सचिव एकनाथ पाखरे यांनी प्रास्ताविक केले. आयु. मुरलीधर गंगावणे यांनी कार्यक्रमाचे सांगता केली. यावेळी मंडळाचे सचिव एकनाथ पाखरे, कार्याध्यक्ष प्रकाश सोनवणे, उपाध्यक्ष मिलिंद दाभाडे, कोषाध्यक्ष सुनील खरात, निमंत्रक रमेश वानखडे, संघटक उत्तम जाधव, संतोष सोनवणे, मुरलीधर गंगावणे, अशोक (मामा) सूर्यवंशी, ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे सहसचिव संदीप सोनवणे, शिक्षक प्रकाश पाखरे आदीसह बहुसंख्य उपासक उपस्थित होते.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.